महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार







छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७५ वा | दिनांक : १५/१२/२०२४ | वार : रविवार


## महायुतीत मलाईदार खात्यांसाठी भांडण : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा आरोप



**मुंबई :** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शनिवारी महायुती सरकार सत्ताधारी महायुतीतील घटकपक्षांत मलाईदार खात्यांसाठी भांडण सुरू झाल्याचा आरोप केला. परभणीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व त्यांच्या हातातील संविधानाची विटंबना झाली. काँग्रेसने सरकारला या घटनेची तत्काळ दखल घेण्याची विनंती केली. पण हे सरकार मलाईदार खात्यांसाठी आपसातच भांडण करण्यात व्यस्त आहे, असे ते म्हणालेत.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शनिवारी दुपारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी परभणी येथे संविधानाच्या विटंबनेनंतर उसळलेल्या हिंसाचारावर भाष्य केले. ते म्हणाले की, हे सरकार लोकांनी विरोध केला की त्यांना बेदम मारते. मनुष्य हा जनावरांसारखा आहे असे कृत्य परभणीत घडले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व त्यांच्या हातातील संविधानाच्या झालेल्या विटंबनेचा काँग्रेसने सुरुवातीलाच निषेध केला. तसेच शासनाला या घटनेची तातडीने दखल घेण्याची विनंती केली. पण त्यानंतरही तिघांच्या सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले.

हे सरकार मलाईदार खात्यांसाठी आपसातच भांडण करण्यात व्यस्त आहे. मलाईदार खाते कुणाला मिळतात? यावर त्यांचे काम सुरू आहे. त्यांच्या निर्देशानुसारच पोलिसांनी आंबेडकरी अनुयायांवर लाठीमार केला. त्यामुळे या प्रकरणी परभणीच्या पोलिस अधीक्षकांसह जिल्हाधिकाऱ्यांवर निलंबनाची कठोर कारवाई झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे.

नाना पटोले पुढे म्हणाले, सोमवारपासून राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. त्यात परभणीच्या मुद्यावरून सरकारला धारेवर धरले जाईल. लोकांनी आपल्या हक्कांची मागणी केली तर त्यांना बेदम मारले जाईल असा संदेश सरकारने परभणीच्या घटनेवरून दिला आहे. पण काँग्रेस या महाराष्ट्रात ही बेबंदशाही व हिटलरशाही अजिबात चालू देणार नाही. कारण, हा फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पक्षाच्या विद्यमान दयनीय स्थितीविषयी केलेल्या विधानावरही नाना पटोले यांनी यावेळी भाष्य केले. ते म्हणाले, निवडणुकीचे जे काही निकाल आलेत, त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला जबर धक्का बसला आहे. जनता या धक्क्यातून अजूनही सावरली नाही. त्यामुळे राज्यातील विविध गावांत ईव्हीएमवर नव्हे तर बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचे ठराव पारित होत आहेत. लोक आपण दिलेले मतदान कुठे गेले? हे शोधण्याचे काम करत आहेत. पण हे सरकार लोकांच्या व्यक्तीस्वातंत्र्यावरही घाला घालण्याचे काम करत आहे. त्यामुळे स्वाभाविकच आहे की, विजय वडेट्टीवार यांनी राज्यात कोणतीही लाट नव्हती असे विधान केले आहे.

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेसमधील काही पदाधिकाऱ्यांनी नाना पटोले यांच्या नेतृत्वावर शंका उपस्थित केली. याविषयी बोलताना पटोले म्हणाले की, राजकीय पक्षात सर्वच गोष्टी चालतात. भाजपमध्येही काही लोक नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांच्यावर आक्षेप घेतात. त्यामुळे हे प्रकार केवळ काँग्रेसमध्येच होतात असे नाही. पण पक्षातल्या गोष्टी माध्यमांपुढे नव्हे तर पक्षाच्या व्यासपीठावरच मांडणे योग्य असते.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस अध्यक्षांपासून सर्वचजण सहभागी झाले होते. तिकीट वाटप, प्रचार आदी सर्वच कामांत त्यांचा सहभाग होता. त्यामुळे पराभवाची जबाबदारी सर्वांचीच आहे. या प्रकरणी श्रेय व श्रेयवादाचा विषय नाही. हा एकप्रकारचा आत्मचिंतनाचा भाग आहे. आता महाराष्ट्रातील जनतेने ईव्हीएमविरोधात सुरू केलेल्या लढाईवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. कारण ही जनभावना आहे. काल आमच्या नेत्या प्रियंका गांधी यांनीही संसदेत संविधानावर चर्चा सुरू असताना संविधान व लोकशाही वाचवायची असेल तर या देशात मतपत्रिकेवरच मतदान घेण्याची मागणी केली, असे नाना पटोले म्हणाले.

## लालकृष्ण अडवाणी अपोलो रुग्णालयात दाखल : दीड महिन्यात तिसऱ्यांदा प्रकृती खालावली



**नवी दिल्ली -** भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी (९६) यांची प्रकृती पुन्हा एकदा खालावली आहे. त्यांना दिल्लीतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

त्यांची मुलगी प्रतिभा अडवाणी यांनी सांगितले की, त्यांना रुटीन चेकअपसाठी रुग्णालयात आणण्यात आले आहे. न्यूरोलॉजिस्ट डॉ. विनीत सुरी यांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

यापूर्वी २६ जून रोजी दिल्लीच्या एम्समधील यूरोलॉजी विभागाच्या देखरेखीखाली त्यांच्यावर किरकोळ शस्त्रक्रिया करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. सुमारे एक आठवड्यानंतर, ३ जुलै रोजी रात्री ९ वाजता त्यांची तब्येत अचानक बिघडल्याने त्यांना अपोलोमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, एक दिवसानंतर ते घरी आले होते.

## दादर हनुमान मंदिर प्रकरणावर मुख्यमंत्री फडणवीसांची प्रतिक्रिया




**पुणे :** दादर येथील हनुमान मंदिराला रेल्वेने नोटीस दिल्यानंतर राजकारण चांगलेच तापले होते. या मुद्द्यावरून उद्धव ठाकरे यांनी सरकारला धारेवर धरले होते. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडून आरोप-प्रत्यारोप आणि दावे-प्रतिदावे करण्यात आले. अशात आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मुद्द्यावर प्रतिक्रिया दिली आहे. न्यायालयाने मागील काळात निर्णय देऊन मंदिरांच्या श्रेणी केल्या आहेत. जुनी मंदिरे त्या श्रेणीनुसार नियमित करता येतात. त्यामुळे रेल्वे प्रशासनाशी चर्चा करून आम्ही त्यातून नक्कीच मार्ग काढू. नियमातील तरतुदीनुसार त्या मंदिराचे नियमितीकरण आपण करून घेऊ, असे देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केले. ते आज पुणे येथे माध्यमांशी संवाद साधत होते.

रेल्वे प्रशासनाकडून दादर स्थानकावर पुनर्विकासाची कामे करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे दादर स्थानकाजवळील ८० वर्षे जुने हनुमान मंदिर हटवण्याबाबत मंदिर प्रशासनाला रेल्वेकडून नोटीस पाठवण्यात आली होती. या नोटीशीला स्थानिकांसह राजकीय विरोधकांनीही तीव्र विरोध केला. या प्रकरणावरून उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजपवर जोरदार हल्लाबोल केला होता. नोटीसीला स्थगिती या प्रकरणी आदित्य ठाकरे यांनी मंदिरात जाऊन आरती करण्याची घोषणा केल्यानंतर वातावरण अधिकच तापले होते. पण तत्पूर्वी, रेल्वेने आपल्या नोटीसीला स्थगिती दिली. भाजप नेते मंगलप्रभात लोढा यांनी शनिवारी या मंदिराला भेट दिल्यानंतर ही माहिती दिली. रेल्वेने आपल्या नोटीसीला स्थगिती दिली आहे. त्यामुळे या मंदिरात यापुढेही हनुमानाची नित्यपूजा व आरती सुरू राहील, असे लोढा यांनी सांगितले.

आदित्य ठाकरेंकडून हनुमानाची आरती दरम्यान, आदित्य ठाकरे यांनी घोषणा केल्याप्रमाणे शनिवारी सायंकाळी दादर येथील हनुमान मंदिरात जाऊन महाआरती केली. यावेळी यावेळी त्यांच्यासोबत खासदार संजय राऊत, खासदार अनिल देसाई, सचिन अहिर यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## केजरीवाल यांचे शहा यांना पत्र- दिल्ली क्राइम कॅपिटल बनली

**नवी दिल्ली :** दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून राजधानीतील वाढत्या गुन्हेगारी आणि बिघडत चाललेली कायदा व सुव्यवस्था यावर चिंता व्यक्त केली. या विषयावर चर्चा करण्यासाठी त्यांनी गृहमंत्र्यांकडे तातडीने वेळ मागितला आहे.

पत्रात केजरीवाल यांनी दिल्लीचे 'गुन्ह्यांची राजधानी' म्हणून वर्णन केले आणि महिलांवरील गुन्हे, खंडणी, ड्रग्ज माफिया आणि दिवसाढवळ्या होणाऱ्या हिंसक घटनांचा उल्लेख केला. शाळा-महाविद्यालयांमध्ये दररोज बनावट बॉम्बच्या धमक्या देणाऱ्यांना का पकडले जात नाही, असा सवालही त्यांनी केला.

केजरीवाल म्हणाले की, दिल्ली पोलिस आणि कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी गृह मंत्रालयावर आहे. प्रत्येक गल्लीबोळात खंडणीखोर टोळ्या आणि गुंड सक्रिय झाले आहेत. ड्रग्ज माफियांनी संपूर्ण दिल्लीत आपले पंख पसरले आहेत. मोबाईल आणि चेन स्नॅचिंगने संपूर्ण दिल्ली हैराण झाली आहे.

आज गुन्हेगारांची हिंमत एवढी वाढली आहे की, दिल्लीच्या रस्त्यावर गोळीबार, खून, अपहरण, चाकूहल्ला अशा घटना दिवसाढवळ्या घडत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ डिसेंबर २०२४


## औषध निर्मितीच्या क्षेत्रात फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण संशोधन करावे - शरण पाटील




**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : व्यवसायिक अभ्यासक्रम व तंत्र कौशल्ये हे आधुनिक जगात रोजगार आणि करिअर विकासाची महत्वाची अंगे आहेत.

प्रामुख्याने व्यावसायिक कौशल्य, औद्योगिक ज्ञान आणि तांत्रिक क्षमता आजच्या तरुणांमध्ये असणे गरजेचे आहे. तांत्रिक अभ्यासक्रम, माहिती तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर विकास, यंत्र अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल अभियांत्रिकी, व्यवस्थापन अभ्यासक्रम, व्यवसाय व्यवस्थापन याकडे विद्यार्थ्यांनी करिअर म्हणून पाहिले पाहिजे.

आज आरोग्य क्षेत्रामध्ये औषध निर्मितीच्या कार्यामध्ये फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण संशोधन करुन औषध निर्मितीमध्ये तरुणांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांनी केले.

नगर शिक्षण विकास मंडळ संचलित माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा सत्कारप्रसंगी शनिवारी ( ता. 14) रोजी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर होते. यावेळी नाट्य कलावंत संजय कोथळीकर, विज्ञान शिक्षक विजय दिंडोरे, माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, फार्मसी कॉलेजचे समन्वय प्रा. डॉ. रवींद्र आळंगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कै. माधवराव (काका) पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नाट्य कलावंत संजय कोथळीकर, प्राचार्य श्रीराम पेठकर, विजय दिंडोरे यांना मनोगत व्यक्त केले.

उपप्राचार्य योगेश पाटील, प्रा. प्रियंका काजळे, प्रा. वैष्णवी पाटील, प्रा. सदाफलमास मुजावर, प्रा. अनिल मोरे, प्रा. राहुल इंजे, प्रा. सुदिप ढंगे, अमोल कटके, किशोर कारभारी आदींनी पुढाकार घेतला. नबीलाल जमादार, प्रतीक राठोड, सुरज साठे, दिनेश गडवे, सलोनी वाघे, श्रीया मुरूमकर, आकांक्षा इंगळे, सुप्रिया बावा आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पायल अंबर यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. विनीत बागडे व प्रा. सरोजा कालजाते तर आभार प्रा. विवेकानंद चौधरी यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने पालक, विद्यार्थी-विद्यार्थिनी व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

याप्रसंगी संजय कोथळीकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वतःच्या करिअर सोबतच अन्य कला-कौशल्य आत्मसात करुन स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी. याकरिता स्वतःमध्ये असणाऱ्या सुप्त कलागुणांचा विकास करण्याकरिता सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेणे गरजेचे आहे.

## गुन्हा दाखल असूनही वाल्मिक कराड खुला फिरतोय : संभाजीराजे भोसले

### धनंजय मुंडेंना मंत्री न करण्याची अजितदादांकडे मागणी



**बीड** : मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची एसआयटी चौकशी करावी, अशी मागणी माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी केली. तसेच खूनाचा तपास पूर्ण होईपर्यंत येथील आमदारांना मंत्रिपद देऊ नये, अशी मागणीही संभाजीराजे यांनी अजित पवारांकडे केली आहे. फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात एवढ्या क्रूरपणे हत्या होऊ शकते? यावर विश्वासच बसत नाही, असे म्हणत संताप व्यक्त केला.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचा सोमवार ९ डिसेंबर रोजी अपहरण करून खून झाला होता. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती आणि पँथर सेनेचे दीपक केदार यांनी शनिवारी मस्साजोग येथे भेट देऊन देशमुख कुटुंबियांचे सांत्वन केले. यानंतर माध्यमांशी संवाद साधताना संभाजीराजे यांनी या प्रकरणावरून संताप व्यक्त केला.

शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात इतकी क्रूर हत्या होऊ शकते, यावर विश्वास बसत नाही, असे संभाजीराजे म्हणाले. आपण शिवरायांचे वंशज आहोत, शिवरायांनी सर्व जाती धर्मांतील लोकांना सोबत घेतले. या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनीही लक्ष घालावे, अथवा उद्रेक झाला तर आपण जबाबदार नाही, असा इशाराही संभाजीराजे यांनी सरकारला दिला.

संतोष यांनी सर्व समाजासाठी काम केले. दलित लोकांवरील अन्यायाच्या विरोधात लढल्याने त्याचा खून झाला. या प्रकरणाला जातीय रंग नको, असे आवाहन संभाजीराजे यांनी केले. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी नेमली जावी, अशी मागणी संभाजीराजे यांनी यावेळी केली. तसेच जिल्ह्यातील आमदारांनी अधिवेशनात हा मुद्दा लावून धरावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या प्रकरणातील प्रमुख आरोपी सुदर्शन घुले फरार आहे. तो कुठल्या पक्षाचा आहे हे अजित पवारांनी परीक्षण करावे. या प्रकरणातील आरोपी विष्णूचा चाटे याला वाल्मिकी कराड सपोर्ट करतोय. वाल्मीक कराडवर गुन्हा दाखल असून देखील तो खुला फिरत आहे. सरकारला हे कसं जमते? असा सवाल संभाजीराजे यांनी उपस्थित केला.

घटनेनंतर केज पोलिसांनी तीन तास विलंब केला. या प्रकरणात पोलिसांची भूमिका संशयास्पद वाटते. त्यामुळे केजच्या पोलिस निरीक्षकांना सहआरोपी केले पाहिजे, अशी आमची मागणी असल्याने संभाजीराजे म्हणाले. पोलिस महासंचालकांशी या प्रकरणी फोनवर चर्चा झाली. पण त्यांनादेखील या प्रश्नाचे उत्तर देता आले नसल्याचे त्यांनी सांगितले.

हे सगळे अजित पवारांच्या पक्षाचे लोक आहेत. देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळत नाही तोपर्यंत तुमच्या मतदारसंघातील आमदारांना मंत्री करू नका, अशी मागणी संभाजीराजे यांनी अजित पवारांकडे केली. ही माझीच नाही तर येथील सगळ्या ग्रामस्थांची भूमिका असल्याचेही ते म्हणाले. अजितदादांनी या ठिकाणी येऊन भेट द्यावी. याबाबत सगळ्या आमदारांनी आवाज उठवावा, असे आवाहन संभाजीराजे यांनी केले.

## दादरच्या हनुमान मंदिरात भाजप - ठाकरे गटात मोठा राडा

**मुंबई** : दादर येथील हनुमान मंदिराला रेल्वेने नोटीस दिली होती. त्यावरून उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे चांगलेच आक्रमक झाले होते. भाजप नेते किरीट सोमय्या मंदिरात दर्शनासाठी आले होते. यावेळी मंदिराच्या परिसरात मोठ्या प्रमाणात शिवसैनिक उपस्थित होते. किराट सोमय्या मंदिरात येताच शिवसैनिक आक्रमक झाले. त्यामुळे भाजपचे कार्यकर्ते आणि ठाकरेंचे शिवसैनिक आमने-सामने आल्याने गदारोळ उडाला होता. ठाकरेंच्या शिवसैनिकांनी किरीट सोमय्या यांना बाहेर काढण्याची मागणी केली. दादरच्या हनुमान मंदिरात भाजप कार्यकर्ते आणि ठाकरे गटात मोठा राडा झाल्याचे पाहायला मिळावे. भाजप नेते किरीट सोमय्या मंदिरात येताच ठाकरेंच्या शिवसैनिकांकडून जोरदार घोषणाबाजी सुरू केली. बाहेर काढा, याची लायकी नाही, अशी मागणी शिवसैनिकांकडून करण्यात आली होती. त्यामुळे मंदिर परिसरात वातावरण चांगलेच तापले होते. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत किरीट सोमय्या यांना तेथून बाहेर काढले.

रेल्वेने दादर येथील ८० वर्षे जुने हनुमानाचे मंदिर पाडण्यासाठी नोटीस बजावली होती. उद्धव ठाकरे यांनी या प्रकरणी भाजपवर टीकेची झोड उठवली होती. यामुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापले होते. आदित्य ठाकरे यांनी या मंदिरात जाऊन आरती करण्याची घोषणा केल्यानंतर वातावरण अधिकच तापले होते. पण तत्पूर्वी, रेल्वेने आपल्या नोटीसीला स्थगिती दिली. भाजप नेते मंगलप्रभात लोढा यांनी शनिवारी या मंदिराला भेट दिल्यानंतर ही माहिती दिली. या धार्मिक मुद्यात आम्हाला राजकारण आणण्याची इच्छा नाही, असे लोढा म्हणाले होते.महापालिका निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे हिंदुत्व घेत आहेत. कारण या मुद्द्यावर डिपॉझिट जप्त झाली आहेत.

हनुमान चालीसा वाचणाऱ्या भक्तांना जेलमध्ये टाकणाऱ्या उद्धव ठाकरेंना आता हनुमानाच्या शरणी जावे लागत आहे. त्यांनी मौलाना सज्जाद नोमानी, उलेमा बोर्ड, मराठी मुस्लिम सेवा संघ, वोट जिहादचे शरण स्वीकारले आहे. त्यांनी तिथेच राहावे, अशा शब्दांत किरीट सोमय्या यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे.हनुमान मंदिर हटविण्यास स्थगिती देण्यात आली, मात्र, ती घाईघाईत देण्यात आली, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली. तुम्हीच पाठलेल्या नोटीसीविरोधात आंदोलन करत आहात, ही हास्यास्पद बाब आहे, असा घणाघात आदित्य ठाकरे यांनी केला.

निवडणुकीसाठी हिंदुंना वापरले जाते. निवडणुका झाल्यानंतर ह्यांच्याच राज्यात आमची मंदिरे सुरक्षित नसतात, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी भाजपवर केला. भाजपचे सरकार स्थापन झाल्यानंतर हिंदू मंदिरेच पहिले धोक्यात येतात. त्यात हे हनुमानाचे मंदिर होते, असेही आदित्य ठाकरे म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ डिसेंबर २०२४


## कन्नड चे भूमिपुत्र रोहित खरे यांची लेफ्टनंट कर्नल पदी बढती



**कन्नड (अरुण थोरात):** भोकनगाव ता.कन्नड या छोट्याशा खेड्यातील शेतकरी पुत्र रोहित खरे यांचे वडील रमेश खरे शेतकरी तर आई मंगलताई या गृहिणी आहे. भारतीय सैन्यातील तोफखाना विभागातील एका शेतकऱ्याच्या मुलाने लेफ्टनंट कर्नल पदावर बढती मिळवून आपली कन्नड तालुक्याचे आणि जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे. साध्या शालेय शिक्षण घेणाऱ्या या अधिकाऱ्याने कठोर मेहनत, निष्ठा, आणि कर्तव्य भावनेच्या जोरावर हे पद प्राप्त केले आहे. या सुपर क्लास वन श्रेणीतील पदावर पोहोचणे हेच त्यांच्या प्रचंड प्रतिभा, मेहनत, प्रामाणिकता आणि समर्पणाचे प्रतीक मानले जाते. लेफ्टनंट कर्नल हे भारतीय सैन्यातील एक अत्यंत प्रतिष्ठेचे पद असून, या पदावर असलेल्या अधिकाऱ्याला मोहिमांचे नियोजन, रणनीती आखणे, आणि मोठ्या प्रमाणावर नेतृत्व करण्याची जबाबदारी असते. अशा उच्च पदावर पोहोचण्यासाठी कमीतकमी १२-१३ वर्षांची सेवा, कठोर प्रशिक्षण, आणि अपार निष्ठा आवश्यक असते. असे स्थान मिळवणे केवळ एका व्यक्तीच्या मेहनतीची साक्ष देत नाही, तर त्याच्या व्यावसायिक नैपुण्याची आणि नेतृत्व गुणांची प्रचिती ही देते. त्यांच्या कुटुंबाची पार्श्वभूमी पाहता, ते एका साध्या शेतकरी कुटुंबातून आले असून, लहानशा गावात अत्यंत सामान्य परिस्थितीत शिक्षण घेतले आहे. आधुनिक सुविधा नसलेल्या गावातून आलेल्या या अधिकाऱ्याने कठीण परिस्थितीं वर मात करत सैन्यात दाखल होण्याचे स्वप्न पूर्ण केले. आणि आता या प्रतिष्ठित पदापर्यंत मजल मारली.

तोफखाना विभागात त्यांनी आतापर्यंत अनेक महत्त्वाच्या मोहिमांमध्ये भाग घेतला आहे. त्यांनी त्यांच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी अनेक वेळा प्रशस्ति पत्रक आणि सन्मान मिळवले आहेत. लेफ्टनंट कर्नल पदावर बढती मिळाल्याने आता त्यांच्यावर अधिक जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. त्यांच्या कामगिरीने आणि कर्तव्य निष्ठेने त्यांनी आपल्या सहकाऱ्यां समोर आदर्श निर्माण केला आहे. अशा उच्च पदावर पोहोचणे हे त्यांच्या अपार जिद्दीचे प्रतीक आहे. त्यांनी दाखवलेली समर्पण भावना आणि देशसेवा ही तरुणां साठी प्रेरणादायी ठरत आहे.या निवडीबद्दल विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जिल्ह्याचे खा. संदिपान भुमरे, आ. संजना जाधव, आ. विठ्ठलराव लंघे पाटील, मा.आ. उदयसिंग राजपूत, मा. आ नामदेव पवार, मा.आ किशोर पाटील, ऐश्वर्या खरे, कृषिभूषण डॉ. सिताराम जाधव, डॉ सदाशिव पाटील, गणपतराव खरे, सुनीलराव लंघे पाटील, मदनराव पवार, अनिरुद्ध पवार, अण्णा चव्हाण, सुभाष मगर, डॉ कृष्णा सपकाळ आदींनी अभिनंदन केलं.

## कलावंत घडवणारा महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सव




**कन्नड (अरुण थोरात):** दि. १३ डिसेंबर रोजी सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय व बाळासाहेब पवार फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय संगीत महोत्सवाचा समारोप समारंभ सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाच्या प्रांगणात पार पाडला. या समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून कन्नड सोयगाव मतदारसंघाचे आमदार संजनाताई जाधव व छत्रपती संभाजी नगर सिडकोचे प्रशासक भागवत बिघोल उपस्थित होते. लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी बोलताना आमदार संजनाताई जाधव म्हणाल्या की या संगीत महोत्सवाच्या माध्यमातून कन्नड सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. याचा फायदा घेऊन भविष्यात कन्नड मधून महाराष्ट्रात मोठे कलावंत निर्माण होतील. सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयाच्या माध्यमातून स्पर्धात्मक विद्यार्थी घडविण्यासाठी अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. याचा फायदा विद्यार्थी कलावंतांनी करून घ्यावा. सिडकोचे प्रशासक भागवत बिगोल म्हणाले की न्यूनगंड न बाळगता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रांमध्ये झेप घ्यावी. गुणवत्ता व मेहनत करण्याची शक्ती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असते. मी सुद्धा ग्रामीण भागातून येऊन स्पर्धा परीक्षेत यश मिळवले आहे. या महोत्सवात विविध लोककला, लोकनृत्य, लोकगायन यांचे सादरीकरण झाले यात मुलींचा लक्षणीय सहभाग होता. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार, प्राचार्य डॉ विजय भोसले प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर, रामकृष्ण पवार, रुपेश मोरे यांच्यासह कन्नड मधील प्रतिष्ठित नागरिक, पालक, विद्यार्थी कलावंत व मोठ्या प्रमाणात रसिक श्रोते उपस्थित होते. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

या स्पर्धेचे परीक्षण ज्ञानेश्वर भवर, विवेक राजे शिंदे व सुमित रामदास धुमाळ यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सागर जाधव, सूत्रसंचालन प्रा डॉ. कारभारी भानुसे यांनी केले. स्पर्धेतील विजेते संघ पुढीलप्रमाणे, समूह गायन प्रथम पारितोषिक: - श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय बनशेंद्रा द्वितीय पारितोषिक:- ताल निनाद संगीत महाविद्यालय कन्नड तृतीय पारितोषिक: - जवाहर नवोदय विद्यालय कन्नड उत्तेजनार्थ पारितोषिक:- कृष्ण तारा इंग्लिश स्कूल कन्नड, समूहनृत्य प्रथम पारितोषिक: - गौताळा व्हॅली इंग्लिश स्कूल कन्नड द्वितीय पारितोषिक:- जिल्हा परिषद प्रशाला टापरगाव, तृतीय पारितोषिक:- छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय बनशेंद्रा, उत्तेजनार्थ पारितोषिक:- जिल्हा परिषद प्रशाला नेवपूर, एकल गायन प्रथम पारितोषिक:- काशिनाथराव पाटील विद्यालय कन्नड, एकल नृत्य द्वितीय पारितोषिक - जवाहर नवोदय विद्यालय कन्नड एकल गायन तृतीय पारितोषिक - जवाहर नवोदय विद्यालय कन्नड, एकल नृत्य:- उत्तेजनार्थ पारितोषिक- साने गुरुजी विद्यालय कन्नड


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002